# वर्धा नगर परिषद,वर्धा

**महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम,1966 चे कलम 45 आणी**

**महाराष्ट्र नगर परिषद अधिनियम, 1965 चे कमल 189 (4) अन्वये याद्वारे**

क्रमांक 507 /बांध/नर/नयव/16
दिनांक:- 11/11/16

प्रति,
श्री/श्रीमती अकबरअली बदरुद्दिन हुसैन
मंसुरअली बदरुद्दिन हुसैन,व
रा. तिवारी लेआउट,वर्धा

विषय :- इमारत बांधकाम मंजुरी व आरंभ प्रमाणपत्र
संदर्भ :- आपला अर्ज क्रमांक 208, दि. 09.03.2016

महोदय,

विषयांकीत प्रकरणी संदर्भिय अर्जान्वये दाखल झालेल्या प्रस्तावानुसार तपासणीअंती

भुखंड क्र. 80+81 शिट क्र. 35 मौजा चिंचाळा भुखडाचे क्षेत्रफळ 600 चौ.मी प्रभाग न.2 मुख्य बाजारपेठ,वर्धा येथे 780.00 चौ.मी. रहिवाशी इमारत बांधण्याकरीता खालील अटी व शर्तीनुसार मंजुरी प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

1) समोरील तसेच मागिल व भुखंडाचे दोन्ही बाजुंनी प्रत्येकी अमलबजावणीकरीता सोडावयास लागणा-या नियमाचे अंमलबजावणीकरीता म्हणुन रिकामी झालेली जागा सोडावयाची समास अंतर ही सार्वजनिक रस्त्याचा भाग असेल.

2) कोणत्याही इसमास राहण्याचे प्रमाणपत्र प्राप्त होईपर्यंत नविन इमारत अथवा तिचा भाग राहण्याकरीता उपयोग अथवा राहण्याकरीता परवानगी घेतलेली/उपयोगी होण्याकरीता नसेल.

3) आरंभ प्रमाणपत्र/इमारत परवाना हे परवाना पत्र मिळालेल्या दिनांकापासुन एक वर्षाकरीता अनुज्ञेय राहील.

4) जी जमीन अर्जदाराच्या मालकीची नसेल ती विकसीत करण्यासाठी परवानगी अधिकार देणार नाही.

5) नकाशा मंजुर केल्याप्रमाणे/लाल रंगाने त्यात दुरुस्त्या सुचविल्याप्रमाणे आपल्या घरास/भुखंडास लागुन असणा-या विध्यमान इमारत उपविधी व विकास नियंत्रण नियमावलीतील तरतुदीस अनुसरुन प्रस्तावीत घराचे/इमारतीचे बांधकाम असावयास पाहीजे.

6) न्हाणी व संडास, स्वयंपाकगृह इत्यादीचे सांडपाणी, घाणपाणी व कचरा याची तांत्रिकदृष्ट्या योग्य रितीने विल्हेवाट लावावी.

7) अर्जदारास मंजुर नकाशाव्यतीरीक्त त्यात फेरबदल करावयाचे असल्यास नगरपालीकेची पुर्व मंजुरी घेणे आवश्यक राहील.

8) बांधकाम परवानगी प्रमाणे प्लिंथ लेव्हल पर्यंतचे बांधकाम कामे नगरपालिका कडुन तपासणी झाल्याशिवाय पुढिल बांधकाम करु नये.

9) बिना परवानगी बांधकाम साहित्य, मलमा सार्वजनीक जागेवर किंवा रस्त्यावर टाकु नये, तसे आढळल्यास आपणावर दंडात्मक वा साहित्य जप्तीची कार्यवाही करण्यात येईल.

10) लेआउट टाकल्यानंतर खोदकामापुर्वी नगर पालिकेचे सक्षम अधिका-याकडुन तपासणी झाल्याशिवाय व तसे प्रमाणपत्र दिल्याशिवाय खोदकाम सुरु करु नये. वरील पैकी कोणत्याही अटीचे उल्लंघन केल्यास होणा-या परिनामाची सर्वस्वी जबाबदारी मिळकत धारकाची राहील.

11) भविष्यात नगर पालिकेला नालीकरीता जागा लागल्यास ती समास अंतरातुन विनामुल्य द्यावी लागेल.

12) मंजुर अभिन्यास/रेकार्ड प्रमाणे जागेची आखणी करुण घेण्याची व मालकी हक्काची सर्वस्वी जबाबदारी
अर्जदाराची राहील. नगर पालिकेची जबाबदारी राहणार नाही.
13) ना अनुज्ञेय बांधकाम अर्जदाराने स्वत: दोन महिन्याचे आंत पाडुन टाकावे. अन्यथा नगरपालिका
कोणतीही नोटिस न देता पाडून टाकेल. होना-या नुकसानीस अर्जदार स्वत: जबाबदार राहील व पाडण्याचा
खर्च नगर परिषद वसुल करेल.
14) पिण्याचे पाण्याची उपलब्धता वाढविणेबाबतचे स्त्रोत बळकटी करण्याकरीता दिलेल्या योजनेप्रमाणे
व्यवस्था करावी. अन्यथा आपणास इमारत वापर परवाना मिळणार नाही.
15) रुफस्टाप रेन हार्वेस्टिंगची व्यवस्था प्रमाणित करावी तसेच सौर उर्जेवर पाणी तापविण्याचा पद्धतीचा
वपर करावा.
16) भुकंप प्रतिबंधक उपाययोजना करुन (नोंदणीकृत स्ट्रक्चरल) इंजिनिअर कडुन आ.सी.सी डिझाइन
करुन घेणे व तसे प्रमाणपत्र नगर परिषद कडे सादर करणे बंधनकारक राहील. तसेच सदर इमारतीचा
पुर्णत्वाचा दाखला घेण्यापुर्वी Structural Stability बाबत नाहरकत प्रमाणपत्र सादर करने बंधनकारक राहील
17) महाराष्ट्र अग्निशमन अधिनियम 2006 व नियम 2009 नुसार प्रत्यक्ष साईटवर अग्निशमन व्यवस्था
करुण द्यावी लागेल. तसेच त्याबाबतचे प्रमाणपत्र अग्निशमन विभागाकडुन प्राप्त करुण संबधितास सादर
करने बंधणकारक राहील.
18) चांगल्या दर्जाची फ्लॅश अॅश ब्रिट चा वापर बांधकामाकरीता करणे आवश्यक आहे.
19) इमारतीवर मोबाईल टॉवरचे बांधकाम परवानगी शिवाय करता येणार नाही.
20) बांधकाम पुर्ण झाल्यानंतर आवेदकाने इमारत बांधकाम पुर्णत्वाचे (Complection Certificate)प्रमाणपत्र
देउन Occupancy Certificate घेणे बंधनकारक आहे.
21) इमारतीच्या प्रत्येकी 10 मिटर अंतरावर 1 वृक्ष असे एकुण 2 वृक्ष तसेच समोरील रस्त्याचे भागात 2
वृक्ष रोपण करणे त्याची देखभाल करणे बंधनकारक आहे.

सुचना

1) संदर्भाधिन इमारत परवाना व आरंभ प्रमाणपत्राची मुदत आपणास प्रमाणपत्र प्राप्त झालेल्या
दिनांकापासुन एक वर्ष पावेतो वैध आहे. अर्जदारास मुदतीचे दोन महिने अगोदर अर्जदारास पुढील एक
वर्षाचे नुतनीकरण करण्याकरीता विहीत नमुन्यात नगरपालिकेत अर्ज करणे आवश्यक आहे
2) आपण नगर पालिकेत जमा केलेली अमानत रक्कम मंजुर नकाशात प्रारंभ प्रमाणपत्रातील अटीप्रमाणे
बांधकाम करणार असल्याची पावती देणे अन्यथा, नगर पालिकेचे पूर्व परवानगीशिवाय आपण बांधकामा
केलेले फेरबदल इत्यादी आपली अनामत रक्कम नगरपालिकेचे खाती वळती/ जमा होईल.
3) नगरपालिकेने मंजुर केलेल्या बांधकामातील पूर्व परवानगी न घेता केलेले फेरबदल हे अवैध व
अनधिकृत राहतील, त्यामुळे महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम 1966 आणि महाराष्ट्र
नगरपालिका अधिनियम 1965 चे अंतर्गत असणा-या तरतुदीनुसार कायदेशिर कार्यवाहीस्तव प्रस्तावित
करण्यात येईल. कायदेशिर कार्यवाही करण्यात येईल.

कार्यालयाचा शिक्का :

मुख्याधिकारी
नगर परिषद, वर्धा

आदेश क्रमांक :-
दिनांक :-
सहपत्र : 1) मंजुर बांधकाम नकाशाची 1 प्रत
2) सुचना फलकावर नमुद करावयाच्या माहितीचे पत्रक

प्रत माहितीस्तव सादर :
1)मा. जिल्हाधिकारी, वर्धा
2)कर अधिक्षक, नगर परिषद , वर्धा
याना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव